पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय
कार्यपत्रिका क्रमांक-६
सभावृत्तांत

दि.- ७/११/२०१२ वेळ दुपारी 3.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या क प्रभाग समितीची मासिक सभा क प्रभाग कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये दि.-७/११/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडूरंग अध्यक्षा
२) मा.आल्हाट मंदा उत्तम
३) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
४) मा.वाबळे संजय मल्हारराव
५) मा.मडिगेरी वर्षा विलास
६) मा.सुपे आशा रविंद्र
७) मा.अजित दामोदर गव्हाणे
८) मा.गोफणे अनुराधा देविदास
९) मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे
१०) मा.गव्हाणे सुरेखा शंकर
११) मा.महेशदादा किसन लांडगे
१२) मा.फुगे सीमा दत्तात्रय
१३) मा. †›.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
१४) मा.विश्वनाथ विठोबा लांडे
१५) मा.ननवरे जितेंद्र बाबा
१६) मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ
१७) मा.भोसले राहूल हनुमंत
१८) मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी
१९) मा.गायकवाड संध्या सुरदास
२०) मा.काटे राजेंद्र भिकनशेठ
२१) मा.शेंडगे आशा सुखदेव
२२) मा.मोटे किरण बाळासाहेब
२३) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण
२४) मा.संजय केशवराव काटे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्री.दिलीप बंब-प्रभाग अधिकारी, श्री.रविंद्र जाधव-प्र.प्रशासन अधिकारी, श्री.रविंद्र दुधेकर-कार्यकारी अभियंता, क-स्थापत्य, श्री. कुदळे- कार्यकारी अभियंता विदयुत, श्री.साळवी-कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.बरशेट्टी- कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा क प्रभाग, श्री.इनामदार-लेखाधिकारी, श्रीम.पाठक-उपअभियंता जलनिस्सारण, श्री.जगताप, श्री.राणे, श्री.सोनवणे -उपअभीयंता स्थापत्य क, श्री.देशमुख, श्री.पाटील-उपअभियंता (विदयुत), श्री.घुबे, श्री.शिंदे, श्री.काळे-उपअभियंता, श्री.नाइकरे-सहा.आ.अधिकारी.

सर्वप्रथम मा.अध्यक्षा यांनी सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात केली.

विषय क्रमांक १) दि. ३/१०/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.५) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्षा यांनी प्रकट केले.

तदनंतर खालीलप्रमाणे मा.अध्यक्ष यांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.

विषय क्र. ४) प्र.क्र. ३० चक्रपाणी वसाहत येथील विविध रस्त्यास नावे देणेबाबत.
विषय क्र.५) रोशल गार्डन मागील भागास महादेवनगर नाव देणेबाबत.
विषय क्र.६) मोशी येथील स्मशानभुमीच्या जागेत जळाऊ लाकुड ठेवण्याकरिता जागा मिळणेबाबत.
विषय क्र.७) दापोडी येथे विविध ठिकाणी ३ x ४ साईजचे चौकोनी फलक बसवून व त्या फलकावर तेथील वस्तीचे नाव व तेथील चाळीचे नाव देण्याबाबत.
विषय क्र.८) प्रभाग क्र. ६१ मध्ये नवीन लाईटचे पोल उभारुन व लाईटीचे दिवे लावणेबाबत.
विषय क्र.९) दापोडी येथे विविध ठिकाणी लोखंडी कमानी (†ल्युमिनीअम कंपोझिट पॅनेल) उभारुन त्या कमानीवर प्रवेश द्वाराचे नाव देण्याबाबत.
विषय क्र.१०) रस्ते डांबरीकरण करुन मिळणेबाबत.
विषय क्र.११) स.नं. २२८,२२९,२३२,२३१ मधुन जाणारा मौजे भोसरी येथील रस्ता भूसंपादनाबाबत.
विषय क्र.१२) नामकरण करण्यास मंजूरी मिळणेबाबत.
विषय क्र.१३) पाण्याची नवीन लाईन टाकण्याबाबत.
विषय क्र. १४) प्रभाग क्र. ६४ दापोडी –बोपखेल मधील बोपखेल येथील पाण्याची टाकीबाबत.
विषय क्र. १५) शितळादेवी चौकात सुशोभिकरण करण्याबाबत.
विषय क्र. १६) ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत.
विषय क्र. १७) मौजे दिघी येथील आरक्षण क्र. २/२१८ बाबत.
विषय क्र. १८) सन २०१२-१३ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत.
विषय क्र. १९) सन २०१२-१३ चे अंदाजपत्रक तरतूद वर्ग करणेबाबत.
विषय क्र. २०) राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी महापालिका प्रभाग फेरीवाला समिती व महापालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करणेबाबत.

ठराव क्र -९८ विषय क्र-२
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.संजय वाबळे अनुमोदक-मा.सुनिता (माई)पांडूरंग गवळी
संदर्भ-मा. संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

इंद्रायणीनगर, भोसरी येथे से नं. २ मध्ये प्राधिकरणामार्फत बांधण्यात आलेल्या मिनी मार्केट इमारतीचे आजुबाजूस पेव्हींग ब्लॉक बसविणे व त्यासाठी येणा-या खर्चास तसेच सदरचे काम वार्ड क्र. २४ इंद्रायणीनगर मध्ये मिनी मार्केट परिसरात फुटपाथ करणे व दुरुस्तीची कामे करणेस ( निविदा क्र. जी ३/२३/१२/११/२०११.१२ या कामातून करुन घेणेस ) मा.वर्षाताई विलास मडिगेरी यांचे दि. ७/११/१२ रोजीचे पत्रान्वये व सभेत विरोध दर्शविला त्यांचा विरोध नोंद करणेत येवून सदर ठराव बहुमताने मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव बहुमताने मान्य झाला.

-----

ठराव क्र - ९९ विषय क्र- ३
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.मंदा आल्हाट अनुमोदक-मा.विनया तापकीर
संदर्भ-मा. प्रभाग अधिकारी यांचेकडील जा.क्र.स्था/कमु/कावि/७१३/२०१२
दि.१८/१०/२०१२

महानगरपालिकेच्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामध्ये खालील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ क्र | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान क्र. | सन २०१२-१३ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद | सुधारित अंदाजपत्रक १२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र. २३ गुळवेवस्ती स्थापत्यविषयक सुधारणा कामे करणे. | स्थापत्य विषयक कामे करणे | पान क्र. ३६८/४६ | ५०००० | ० | ३५०००० | १५०००० |
| २ | वॉर्ड क्र.२३ गुळवेवस्ती येथे स्वच्छतागृह व मुता-या बांधणे. | संडास व मुता-या | पान क्र. ९६५/१९ | ६५०००० | ३५०००० | ० | १०००००० |
| | एकूण | | | ११५०००० | ३५०००० | ३५०००० | ११५०००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर सभाकामकाजात मा.अध्यक्षांचे मान्यतेने ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्र - १०० विषय क्र- ४
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.अनुराधा गोफणे अनुमोदक-मा.सुनिता गवळी
संदर्भ-मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी यांचा प्रस्ताव.

प्र.क्र.३० चक्रपाणी वसाहत येथील विविध रस्त्यास खालील प्रमाणे नावे देणेस मान्यता देणेत येत आहे.

१) राज सोसायटी A २) राज सोसायटी B ३) सिध्दीविनायक सोसायटी A
४) सिध्दी विनायक सोसायटी B

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १०१ विषय क्र- ५
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.सीमा फुगे अनुमोदक-मा.संध्या गायकवाड
संदर्भ-मा. सुनिता (माई) पांडूरंग गवळी

रोशल गार्डन मागिल भागास महादेवनगर कॉलनी क्र. १ ते ५ अशी नावे देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १०२ विषय क्र- ६
दि.-७/११/२०१२ विभाग- भुमि आणि जिंदगी मुख्य कार्यालय
सुचक-मा.मंदा आल्हाट अनुमोदक-मा.चंद्रकांता सोनकाबळे
संदर्भ-मा. मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

मोशी गावातील वखारधारक न्यु प्रगती लाकुड डेपो विक्रेते श्री.सुनिल दामु बोराटे हे असुन त्यांना महापालिकेचया स्मशानभुमित मयती करिता जळाऊ लाकडाचा साठा

करण्यासाठी महापालिकेची स्मशानभुमीची जागा वार्षिक भाडेतत्वावर देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १०३ विषय क्र- ७
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ-मा. रमा ओव्हाळ यांचे पत्र.

दापोडी येथे विविध ठिकाणी ३ x ४ साईजचे चौकोनी फलक बसवून व त्या फलकावर तेथील वस्तीचे नाव व तेथील चाळीचे नाव देण्यास खालील मान्यता देणेत येत आहे.

१) काटे रेसिडेन्सी शेजारी एक फलक-
१) एम.एस.काटे बंगला २) काटे रेसिडेन्सी ३) कै.रामचंद्र काटे चाळ
४) महात्मा फुले नगर

२) जयभिम नगर मार्ग एक फलक-
१) वॉज चाळ २) साळवे मास्तर चाळ ३) सरस्वती अनाथ आश्रम
४) इस्माईल पठाण चाळ ५) जगताप चाळ ६) शिवाजी गणपत जाधव चाळ

३) शिवाजी पुतळयाच्या समोर एक फलक-
१) काची वस्ती २) मंत्री हाऊसिंग कॉम्पलेक्स ३) बारा बंगला
४) मंत्री चेंबर ५) स्वामी विवेकानंद हायस्कुल ६) पाच बंगला

४) जयभीम नगर, मयूर वाटीका शेजारी एक फलक-
१) चिंचामण काटे चाळ २) गुलाब काटे चाळ ३) आबा काटे चाळ
४) इंदिरा नगर ५) जयभवानी नगर ६) आत्तार विट भट्टी

५) किनारा हॉटेल शेजारी एक फलक-
१) काळुराम काटे चाळ २) छत्रपती शाहू महाराज वसाहत
३) एस.एम.एस. कॉलनी ४) पवार वस्ती

६) डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळया समोर एक फलक-
१) दापोडी गावठाण २) विठ्ठल मंदीर ३) महादेव आळी
४) मंत्री निकेतन ५) बाराथे वस्ती ६) बॉम्बे कॉलनी

७) ११ नं.बसस्टॉप शेजारी एक फलक-
१) भिकनशेठ पार्क २) सेनापती चौक ३) शितळादेवी मंदीर
४) मोरया हॉस्पिटल ५) गुरव पिंपळे रस्ता ६) मस्जिद कडे

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १०४ विषय क्र- ८
दि.-७/११/२०१२ विभाग- विदयुत क प्रभाग
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ-मा. रमा ओव्हाळ यांचे पत्र.

प्रभाग क्र. ६१ मध्ये खालील ठिकाणी नवीन लाईटीचे पोल उभारुन व लाईटीचे दिवे लावणेस मान्यता देणेत येत आहे.

| वस्तींची नावे | पोलची संख्या व लाईट |
|---|---|
| १) बॉम्बे कॉलनी | १० |
| २) पाचबंगला | १० |
| ३) गावठाण | १० |
| ४) काची वाडा | १० |
| ५) फुले नगर | १० |
| ६) आत्तार विटभट्टी | १० |
| ७) एस.एम.एस.कॉलनी | १० |
| ८) बापू काटे चाळ आणि काळूराम काटे चाळ | १० |
| ९) बाराथे वस्ती | १० |
| १०) जयभिम नगर परिसर | १० |
| ११) काटे रेसिडेन्सी | १० |
| १२) भिकनशेठ पार्क | १० |
| १३) इतर परिसर | १० |
| एकूण | १३० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १०५ विषय क्र- ९
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.रमा ओव्हाळ अनुमोदक-मा.आशा सुपे
संदर्भ-मा. रमा ओव्हाळ यांचे पत्र.

दापोडी येथील खालील भागातील रस्त्यावर कमानी उभारुन कमानीवर नावे देणेस मान्यता देणेत येत आहे.

१) दापोडी येथील स्मशानभूमीकडे जाणा-या रस्त्यावर (आर.सी.सी.) कमान उभारुन त्या कमानीवर संत तुकाराम महाराज वैकुंठ गमन अशी मूर्ती बसवण्यास व त्या कमानीवर संत तुकाराम महाराज प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

२) सरस्वती अनाथ आश्रमाकडे जाणा-या रस्त्यावर कमान उभारुन त्या कमानीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

३) माजी नगरसेवक अविनाशदादा काटे यांच्या घराशेजारील रस्त्यावर कमान उभारुन त्या कमानीवर महात्मा फुले नगर प्रवेशद्वार असे नांव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

४) संजय पांडूरंग काटे पथ या रस्त्यावर कमान उभारण्यास व त्या कमानीवर छत्रपती शाहू महाराज प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

५) सर्वे नं. ८५, उदयान आरक्षीत जागेवर पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेची वॉल कंपाऊंड भिंत व प्रवेशद्वार तयार आहे तरी त्या प्रवेश द्वारावर तथागत प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

६) विठ्ठल तरुण मंडळ (वरील आळी) कडे जाणा-या रस्त्यावर कमान उभारण्यात यावी व त्या कमानीवर श्री.महालक्ष्मी प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

७) किनारा हॉटेल शेजारुन शंकर मंदिराकडे जाणा-या रस्त्यावर कमान उभारुन त्या कमानीवर मोहम्मद पैगंबर प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

८) बाराथे वसाहत कडे जाणा-या रस्त्यावर कमान उभारुन त्या कमानीवर बाराथे वसाहत प्रवेशद्वार असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्र - १०६ | विषय क्र- १० |
| दि.-७/११/२०१२ | विभाग- स्थापत्य क प्रभाग |
| सुचक-मा.अनुराधा गोफणे | अनुमोदक-मा.संध्या गायकवाड |

संदर्भ-मा. अनुराधा गोफणे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ३३ मधील हनुमान कॉलनी, पसायदान कॉलनी, हुतात्मा चौक, शास्त्री चौक, गाडगे महाराज हौ.सोसायटी, फुलेनगर, रामनगर, श्रीराम कॉलनीतील अंतर्गत रस्ते, उंब-या गणेश मित्र मंडळ, गवळीनगर १ व २, मित्र मंडळ रोड, खंडोबा माळ या ठिकाणचे सर्व रस्ते डांबरीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्र - १०७ | विषय क्र- ११ |
| दि.-७/११/२०१२ | विभाग-नगररचना व विकास विभाग व स्थापत्य |
| सुचक-मा.जालिंदर शिंदे | अनुमोदक-मा.राहुल भोसले |

संदर्भ-मा. जालिंदर शिंदे यांचा प्रस्ताव.

स.नं. २२८,२२९,२३२,२३१ मधुन जाणारा मौजे भोसरी येथील पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग ते पुर्व-पश्चिम १८.० मी.रस्त्यापर्यंत चा १२.० मी.रस्ता रुंदी बाधित क्षेत्राचे भुसंपादन करणेस मान्यता देणेत येत आहे. त्यामुळे सदर परिसरातील रहदारी व वाहतुक सुरळीत होऊन नागरीकांच्या अडचणी दुर होण्यास मदत होईल.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्र - १०८ | विषय क्र- १२ |
| दि.-७/११/२०१२ | विभाग- स्थापत्य क प्रभाग |
| सुचक-मा.संजय वाबळे | अनुमोदक-मा.महेशदादा लांडगे |

संदर्भ-मा. संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

इंद्रायणीनगर प्रभाग क्र. २९ मधील से.न.२ मधील मोकळी जागा क्र. ७ या जागेवर बालउद्यान विकसीत केले आहे. तरी सदर उद्यानाचे " राजमाता जिजाऊ बालोद्यान " असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे तसेच से.नं. २ येथील मोकळी जागा क्र.१० याही मोकळया जागेवर बाल उद्यान विकसीत केले आहे तरी सदर उद्यानचे " छत्रपती संभाजी राजे बालोद्यान " असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

| | |
|---|---|
| ठराव क्र - १०९ | विषय क्र- १३ |
| दि.-७/११/२०१२ | विभाग- पाणीपुरवठा विभाग |
| सुचक-मा.आशा सुपे | अनुमोदक-मा.रमाताई ओव्हाळ |

संदर्भ-मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

भारतमाता नगर सर्व्हे नं. ७६ कॉलनी नं. १ मध्ये ब-याच दिवसापुर्वी पाण्याची लाईन टाकलेली आहे व त्या लाईनमधून दुषीत पाणी येत आहे वपाणी पण खुप कमी दाबाने येत आहे. पुर्वी लोकवस्ती कमी होती व आता लोकवस्ती वाढली आहे म्हणून पाण्याची नवीन लाईन टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ११०　　　　　　　　　　　　विषय क्र- १४
दि.-७/११/२०१२　　　　　　　　　　　　विभाग- पाणीपुरवठा विभाग
सुचक-मा.चंद्रकांता सोनकांबळे　　　　　　अनुमोदक-मा.विनया तापकीर
संदर्भ-मा. चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ६४ दापोडी-बोपखेल मधील बोपखेल रामनगर येथे एक जुनी पाण्याची टाकी आहे. ग्रामपंचायतने बांधलेली पाण्याची टाकी ही जमिनीवर असून ती सध्या बंद आहे. दगडी बांधकामामध्ये बांधलेली ही टाकी वस्तीच्या व रस्त्याच्या मध्यभागी आहे. त्या टाकीचा सध्या काहीही उपयोग नाही तरी सदरची टाकी पाडण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - १११　　　　　　　　　　　　विषय क्र- १५
दि.-७/११/२०१२　　　　　　　　　　　　विभाग- स्थापत्य क प्रभाग
सुचक-मा.राजेंद्र काटे　　　　　　　　　　अनुमोदक-मा.संजय वाबळे
संदर्भ-मा. राजेंद्र काटे यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र. ६२ मधील शितळादेवी चौक याठिकाणी खूप मोठया प्रमाणावर रहदारी वाढलेली आहे. त्याठिकाणी वाहतुक नियंत्रण दिवे लावलेले आहेत परंतु त्याठिकाणी सर्कल उभारणे आवश्यक आहे म्हणून त्याठिकाणी योग्या प्रकारे सर्कल उभारण्याकामी ९,९९,०००/- रुपयांची तरतूद येत्या बजेटमध्ये करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ११२　　　　　　　　　　　　विषय क्र- १६
दि.-७/११/२०१२　　　　　　　　　　　　विभाग- जलनिस्सारण विभाग
सुचक-मा.आशा सुपे　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.रमा ओव्हाळ
संदर्भ-मा. आशा सुपे यांचा प्रस्ताव.

सहकार कॉलनी नं. १ (गणपती मंदिरा जवळ) गेल्या अनेक वर्षापासून ड्रेनेजलाईन टाकलेली आहे व त्या लाईनचा अजिबात स्लोप काढलेला नाही त्यामुळे वारंवार त्या लाईनचा प्रोब्लेम येत आहे व ती लाईन सारखी चोकअप होत आहे. त्याठिकाणी खुप दुर्गंधी पसरते त्यामुळे त्याठिकाणी नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ११३　　　　　　　　　　　　विषय क्र- १७
दि.-७/११/२०१२　　　　　　　　　　　　विभाग- नगररचना व विकास विभाग
　　　　　　　　　　　　　　　　　　　　वैद्यकीय विभाग
सुचक-मा.आशा सुपे　　　　　　　　　　　अनुमोदक-मा.रमा ओव्हाळ
संदर्भ-मा. आशा सुपे व मा.रमा ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

मौजे दिघी येथील स.नं.६६ मध्ये दफनभूमीचे आरक्षण असून त्याचा आरक्षण क्र.२/२१८ आहे. आरक्षणाचे एकूण क्षेत्रफळ ०.८० हेक्टर आहे. दिघी गावातील हे एकमेव आरक्षण आहे. दिघी मध्ये विविध जाती धर्माचे लोक राहत असून त्यांच्यासाठी दफनभूमी जागेची आवश्यकता आहे. सबब उपलब्ध जागेची खालील प्रमाणे विभागणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

१. मुस्लीम समाज-　　५० आर (नाल्याच्या पश्चिमेकडील भाग)
२. ख्रिश्चन समाज-　　१५ आर (नाल्याच्या पूर्वेकडील भाग)
३. हिंदू समाज -　　　५ आर (नाल्याच्या पूर्वेकडील भाग)

तरी वरील प्रमाणेच्या विषयास मान्यता देणेत येत असून मा.महापालिका सभा मान्यतेकामी महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र -११४ विषय क्र- १८
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.महेशदादा लांडगे अनुमोदक-मा.संजय वाबळे
संदर्भ-मा. महेशदादा लांडगे व मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागातील कामासाठी खाली नमुद केल्याप्रमाणे तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक लेखाशिर्ष/ पान क्र. | सन २०१२-२०१३ ची तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतुद | सुधारीत अंदाजपत्रक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१८ मध्ये ठिकठिकाणी मुतारी व ब्लॉकची कामे करणे. | संडास व मुताऱ्या पान क्र. ९६६ अ.क्र.२५ | ५०००० | ० | ५०००० | ० | पान क्र. ३५७ अ.क्र.१९८ वर वर्ग |
| २ | भोसरी वॉर्ड क्र. १८ गवळीनगर मधील उद्यान जवळील म.न.पा.चे ताब्यात असलेली जागा विकसित करणे. | स्थापत्य विषयक कामे करणे पान क्र. ३६७ अ.क्र.४४ | ५००००० | ० | २००००० | ३००००० | पान क्र.३५७ अ.क्र.१९८ वर वर्ग |
| ३ | वॉर्ड क्र. २२ मधील लांडेवाडी, विकास कॉलनी व इतर ठिकाणी गटर ब्लॉकची दुरुस्ती करणे. | किरकोळ दुरुस्ती व देखभाल पान क्र.३५७ अ.क्र.१९८ | ० | ७००००० | ० | ७००००० | |
| | | एकूण | १०००००० | ७००००० | ७००००० | १०००००० | |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ११५ विषय क्र- १९
दि.-७/११/२०१२ विभाग- स्थापत्य
सुचक-मा.जितेंद्र ननवरे अनुमोदक-मा.संजय वाबळे
संदर्भ-मा. जितेंद्र ननवरे व मा.संजय वाबळे यांचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या सन २०१२-१३ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागातील कामासाठी खाली नमूद केल्याप्रमाणे तरतूद वर्गीकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक लेखाशिर्ष/ पान क्र. | सन २०१२-२०१३ ची तरतूद | सुधारीत सन २०१२-२०१३ चा अंदाज | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भोसरी वॉर्ड क्र. १८ गवळी मधील वाहनतळास शेड बांधणे व स्थापत्य विषय कामे करणे व सुधारणा करणे. | स्थापत्य विषयक कामे करणे ३६७/४२ | ५००००० | ० | ० | ५००००० |
| २ | भोसरी वॉर्ड क्र. १८ गवळीनगर मधील उद्यानाजवळील मनपाचे ताब्यात असलेली जागा विकसित करणे. | स्थापत्य विषयक कामे करणे ३६७/४४ | ५००००० | २००००० | ० | ३००००० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | क मुख्यालय वॉर्ड क्र. ९, २३, २४,२५,२६ व १७ साठी विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडपव्यवस्था व अनुषंगीक कामे करणे. | किरकोळ दुरुस्ती व देखभाल ३५६/१८८ | १५०००० | ९५०००० | ८००००० | ० |
| | | एकूण | ११५०००० | ११५०००० | ८००००० | ८००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्र - ११६ विषय क्र- २०
दि.-७/११/२०१२ विभाग- क प्रभाग (हॉकर्स)
सुचक-मा.मंदा आल्हाट अनुमोदक-मा.विनया तापकीर
संदर्भ-मा. मा.प्रभाग अधिकारी क प्रभाग यांचेकडील जा.क्र.कप्र/१९/कावि/९४/२०१२ दि.७/११/२०१२

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग उपसचिव यांनी पत्र क्र.रोफेची/२०१२/प्रक५८/नवि-३४ दि.२१/०८/२०१२ अन्वये सुधारीत केंद्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करणेसाठी राज्यानी प्रथम कृती आराखडा तयार करणेचे सुचना केंद्र सरकारने दिलेल्या आहेत त्याप्रमाणे केंद्र शासनाच्या फेरीवाला धोरणाचे राज्यामध्ये अंमलबजावणी करावी अशा केंद्र शासनाच्या सुचना आहेत असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे मा.आयुक्त यांनी शासनास पत्र क्र.भुजि/२/कावि/२७०/२०१२ दि. १४/०९/२०१२ अन्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरणाची अंमलबजावणी करणेबाबत करावयाचे कृती आराखडा कळविलेला आहे. त्याप्रमाणे केंद्र शासनाचे राष्ट्रीय फेरीवाला धोरण मसुदयामध्ये विविध समिती स्थापना संबंधी तरतुद आहे. त्यानुसार महापालिका प्रभाग फेरीवाला समिती व महापालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापन करणे आवश्यक आहे.

अ) महापालिका प्रभाग फेरीवाला समिती
(WARD HAWKERS COMMITTEE)

| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | प्रभाग समिती अध्यक्ष |
| २ | सदस्य | त्या प्रभागातील सर्व नगरसेवक |
| ३ | सदस्य | प्रभाग अधिकारी |
| ४ | सदस्य | वरीष्ठ पोलिस निरीक्षक |
| ५ | सदस्य | पोलिस निरीक्षक (वहातुक) |
| ६ | सदस्य | वैद्यकीय अधिकारी |
| ७ | सदस्य | अतिक्रमण निष्कासन अधिकारी (प्रभाग कार्यकारी अभियंता) |
| ८ | सदस्य | उपअभियंता (स्थापत्य) |
| ९ | सदस्य् | नगररचना अधिकारी |
| १० | सदस्य | फेरीवाला संघटनेचे ४ प्रतिनिधी त्यापैकी २ महिला |

प्रभाग फेरीवाला समितीच्या एकूण सदसय संख्येपैकी किमान १० टक्के एवढे फेरीवालेंचे प्रतिनिधीत्व असेल सदर प्रतिनिधीचे नामनिर्देशन मा.आयुक्त करतील. समितीच्या एकुण सदस्यापैकी १/३ महिला प्रतिनिधी शक्यतो असाव्यात.

ब) महापालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती
(PCMC WARD HAWKERS TECHNICAL COMMITTEE)

| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | उपायुक्त / प्रभाग अधिकारी / विभागीय अधिकारी |
| २ | सदस्य | अतिक्रमण निष्कासन अधिकारी (प्रभाग कार्यकारी अभियंता) |
| ३ | सदस्य | वरिष्ठ पोलिस निरीक्षक |
| ४ | सदस्य | पोलिस निरीक्षक (वहातुक) |
| ५ | सदस्य | नगररचना अधिकारी |
| ६ | सदस्य | उपअभियंता (स्थापत्य) |

तरी वरीलप्रमाणे महापालिका प्रभाग फेरीवाला समिती व महापालिका प्रभाग फेरीवाला तांत्रिक समिती स्थापना करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(मा.सुनिता (माई) पांडुरंग गवळी)
अध्यक्षा
क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क प्रभाग कार्यालय भोसरी २६
जा.क्र.कप्रस/कावि/ ६६ /२०१२
दि.२७/११/२०१२



प्र. प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
क प्रभाग समिती

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.